# -: दर पत्रक सुचना :-

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह यांची विक्री करिता ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडून सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक माागविण्यााचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

## दरपत्रक कार्यवाही वेळापत्रक

| SR.NO. | Activity | Date/Period |
|---|---|---|
| 1 | Sale Of Quotation(Free Of Cost) | 18/05/2026 to 29/05/2026 |
| 2 | Date Of Submitting Quotation | 01/06/2026 to 10/06/2026 |
| 3 | Last Date Of Submitting Quotation | 11/06/2026 |
| 4 | Quotation Opening | 16/06/2026 |

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक येथिल विक्री करावयाच्या निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह यांचा तपशिल ईच्छूकं नोंदणीकृत प्रतिष्ठांणांनी आपले प्रतिष्ठाणाचे दरपत्रके पात्रतेसाठी खालिल प्रमाणे प्रमाणपत्र/कागदपत्रे सादरकरणे अनिवार्य राहील.

१) Shop Act रजिस्ट्रेशनची प्रत ( गुमास्ता नोंदणी पत्र)

२) Pan Card ची प्रत (पॅनकार्ड)

३) GST Registration Certificate (जि.एस.टी नोंदणी पत्र)

४) Quotation On Firms Letterhead (प्रतिष्ठाणाचे लेटरहेडवर दरपत्रक)

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांना दरपत्रकातील कोणत्याही बाबीची संख्या कमी जास्त करण्याचे आणी कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचे/ वेळापत्रकात बदल करण्याचे/ संपूर्ण प्रक्रीया रदद करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती ईगतपुरी

**आरोग्य विभाग**

**तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी, जिल्हा नाशिक**

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रहलिला व पध्दतीने विक्री करावयाची आहे. इच्छुक ठेकेदारांनी विक्री फॉर्म नमुना प्राप्त करणे साठी या कार्यालयाशी दि.१८/०५/२०२६ते २९/०५/२०२६ या कालावधी मध्ये सकाळी ११ ते ३ या वेळेत संपर्क साधावा.

विक्रीफॉर्म कोटेशन सह जमा करण्याचा अंतिम दि. :११/०६/२०२६

दुरध्वनी क्र. :-
ई-मेल :- tmo.igatpuri@gmail.com

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती ईगतपुरी

## -: अटी व शर्ती :-

१) दरपत्रक तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांचे कार्यालयात दिनांक ०१/०६/२०२६ ते १०/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सादर करावेत.

२) सदरील दरपत्रक मोहर बंद लिफाफया मध्ये सादर करण्यात यावेत. सदरील लिफाफ यावरनिर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उ पकरणे व जड वस्तूसंग्रह खरेदी करीता दरपत्रके असे ठळक पणे नमूद करण्यात यावे.

३) विहीत मुदतीत प्राप्त झालेलीच दरपत्रके स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) सदरील नमूद दरामध्ये खाडाखोड अथवा अंकगिरवले असता सदर दरपत्रक बाद करण्यात येईल.

५) सदरील दरपत्रक तालूकाआरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांचे कार्यालयात दिनांक १६/०६/२०२६ रोजी उघडण्यात येईल.

६) खरेदी धारकास शासकीय कामाचा अनूभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.

७) सदर सर्व लॉटची खरीदारा कडून लावण्यात येणा-या किंमतीची एकूण येणारी रक्कम ज्या खरीदाराची जास्त असेल त्याप्रमाणे अनुक्रम लावले जातील.

८) सदर निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह ७ दिवसाच्या आत उचलकरणे बंधनकारक राहील व उचलकरण्याची जबाबदारी खरेदी धारकाची राहील. याकरिता कुठलाही वाहतूक भत्ता, कूरीयर, किंवा इतर भाडे या कार्यालया मार्फत अदा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) दरपत्रकरंना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये त्रुटी आढळल्या सही दरपत्रके स्विकारणे, नाकारणे, अथवा रदद करणे, इत्यादी अधिकार तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांना राहतील.

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती ईगतपुरी

# विक्री फॉर्म नमूना

विषय :- आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांतील अंतिम निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांचे विक्री करणे बाबत...

संदर्भ :- या कार्यालयाची रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांची विक्री दरपत्रक सुचना arogya.maharashtra.gov.in व www.nhm.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रकाशित दि.१५/०५/२०२६

कार्यालयातील निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांची विक्री पुढील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१) **विक्री करावयाची रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू आपणास तालुकास्तरावरील प्राथमिक आरोग्य केंद्रात दि१८/०५/२०२६ ते १०/०६/२०२६ पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल**

२) विक्री करावयाच्या रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तूंची यादी आपणास तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक येथे **दि १८/०५/२०२६ ते १०/०६/२०२६** पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल

३) वस्तू जशा स्थितीत आहेत त्यास्थितीत विकणे आहे.

४) ठेकेदारास तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक येथून निवीदा फॉर्म प्राप्त करावा लागेल आणि त्याअधिकृत फॉर्मवरच निर्लेखित वस्तू विक्री बाबतचा लखोटा असे नमुद करुन सिलबंद लखोटा जाहीरातील नमुद अंतिम तारखेपुर्वी दि.१०/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावा लागेल.

५) वेळेनंतर अथवा उशिरा आलेले लखोटे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) सदरील लॉट नं. १ व २ हे एकाच ठेकेदारास घेणे बंधनकारक असेल.

७) अधिकृत फॉर्मसादर न केल्यास आपले दरपत्रक रदद करण्यात येईल.

८) संपुर्ण लॉटची किंमत आपणास नमूद करावी लागेल. सदर किंमतीवर आपणास १८ टक्केदराने जी.एस.टी. भरावा लागेल.

९) फॉर्म सोबत पॅनकार्ड, जि.एस.टी नोंदणी पत्र, बँकडिटेल, शॉप ॲक्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. सदर कागदपत्रे आपल्या अर्जासोबत जोडली नसतील तर आपला अर्ज रदद करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१०) आपले दरपत्रक मान्य झाल्यास आणि कार्यालयाचे आदेश आपणास प्राप्त झालेस त्याच दिवशी एकूण १०० टक्के एवढी रक्कम आपणास जमा करावी लागेल आणि धनाकर्षाच्या (डिमांड ड्राफट) च्या स्वरुपात जमा करावी लागेल आणि १८ टक्के जी.एस.टी. व एकूण पुर्ण रक्कम भरल्याशिवाय तसेच जी.एस.टी. भरल्याचे बॅंकेचे चलन या कार्यालयामध्ये पुढील ५ दिवसामध्ये सादर केल्या शिवाय साहीत्य नेण्याची परवानगी देण्यात येणार नाही व आपला कोणताही अधिकार या लॉटवर राहणार नाही.

११) रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू आपणास आहे त्याजागेवरुन कार्यालयास बाब विचारात घेवून स्वखर्चाने घेऊन जावी लागतील.

१२) सदरची निवीदा / फॉर्म स्विकारणे, नाकारणे अथवा रदद करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यालय प्रमुख या नात्याने तालूका आरोग्य अधिकारी, तालूका ईगतपुरी जिल्हा नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत. ते आपणास बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती ईगतपुरी

वरील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला मान्य आहेत. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

सर्व लॉटची एकूण रक्कम रु .................(अक्षरीरु ............................)

(ठेकेदाराचे नाव ,सही , शिक्का आणि मोबाईल नं., ई-मेल)

दिनांक. ..................

# निर्लेखन लॉटची यादी

## जिल्हा परिषद नाशिक

| अ.क्र | विभागाचेनाव | लॉटचेनाव व क्रमांक | एकूण संख्या | हातची एकूणकिंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद नाशिक यांच्या अधिनिस्त तालुका आरोग्य अधिकारी, ईगतपुरी | लॉटक्र. १, रुग्णालयीन उपकरणे | १४८ | ३१८९०/- | |
| २ | | लॉटक्र. २ जडवस्तु संग्रह उपकरणे | ५०५ | ४६४३६/- | |
| ३ | | लॉटक्र. ३ आय.टी. उपकरणे | ९ | २००/- | |

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती ईगतपुरी